**क्रमांक ११९**

**महाराष्ट्र विधानसभा**

**पत्रक भाग दोन**

**<u>बुधवार, दिनांक २४ ऑगस्ट, २०२२ / भाद्रपद २, १९४४ शके</u>**

**११९.** **अध्यक्ष :** गुरुवार, दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी अशासकीय ठराव घेण्यात येणार आहेत. अशासकीय ठरावांचा प्राथम्यक्रम बॅलटद्वारा निश्चित करण्यात आला असून त्याबाबतची माहिती सर्व सदस्यांना पत्रक भाग दोनद्वारे देण्यात आली आहे. बॅलटद्वारा काढण्यात आलेल्या पाच अशासकीय ठरावांमधून तीन अशासकीय ठराव चर्चेकरीता घेण्यासाठी प्रस्तावित करण्यात आले आहेत. अशासकीय ठरावांना द्यावयाचा वेळ अशासकीय विधेयके व ठराव समितीने निश्चित करावयाचा असतो. तथापि, सध्या अशासकीय विधेयके व ठराव समिती नव्याने घटित करण्यात येत असल्याने मी गुरुवार, दिनांक २५ऑगस्ट, २०२२ रोजी अशासकीय कामकाजासाठी उपलब्ध असलेल्या १५० मिनिटांच्या वेळेपैकी १५ मिनिटांचा वेळ पुर:स्थापनार्थ असलेल्या विधेयकांना व उर्वरित १३५ मिनिटांचा वेळ चर्चेकरिता घेण्यात येणाऱ्या खालील नमूद ठरावांना देण्यात आला आहे.

| | | |
|---|---|---|
| (१) | श्री. प्रताप अडसड, वि.स.स. यांचा ठराव क्रमांक - १३३ | ४५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| (२) | श्री.चेतन तुपे, वि.स.स. यांचा ठराव क्रमांक - १७ | ४५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| (३) | डॉ.अशोक उईके, वि.स.स. यांचा ठराव क्रमांक - ५९ | ४५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |

वरीलपैकी कोणत्याही ठरावाचा वेळ वाचल्यास तो त्या पुढील क्रमांकाच्या ठरावाला देण्यात येईल. उर्वरित १५ मिनिटांचा वेळ पुर:स्थापनार्थ असलेल्या अशासकीय विधेयकांकरिता देण्यात येईल.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २४ ऑगस्ट, २०२२

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा

**<u>याची प्रत :</u>**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
३. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
४. संगणक कक्ष (Website)
५. एम.के.सी.एल.